सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

## पेठ बीड भागात विकास कामांचा शुभारंभ

बीड (किसान न्युज): बीड शहरात विकासकामांना गती देत पेठ बीड भागातील अलकबीर हॉल ते उमर मशीद परिसरातील रस्ता व नाली कामाचा शुभारंभ आमदार संदीप क्षीरसागर व माजी आमदार सय्यद सलीम यांच्या हस्ते करण्यात आला. या कामामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार असून पावसाळ्यात होणाऱ्या गैरसोयींवरही मोठ्या प्रमाणात तोडगा निघणार आहे. शुभारंभ प्रसंगी स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन कामाची पाहणी केली तसेच नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांनीही या कामाबद्दल समाधान व्यक्त करत लवकरात लवकर काम पूर्ण केली जाईल असे मत आमदार संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केले सदर रस्ता व नाली काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक सुलभ होणार असून स्वच्छतेच्या दृष्टीनेही मोठा फायदा होणार आहे. स्थानिक प्रशासनाने दर्जेदार काम करण्याचे आश्वासन दिले आहे.

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३३९ ▪ सोमवार, दि. २० एप्रिल, २०२६ ▪ पोस्टल दिनांक २१ एप्रिल, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-339 ▪ Monday 20 April, 2026 ▪ Postal Date 21 April, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# जयदत्त अण्णांना वाटायचे फडणवीस पुनर्वसन करतील पण 'वैद्यनाथाचे' आशीर्वाद मिळत नसल्याने ठाण्याच्या 'नाथाकडे' लावली फिल्डिंग.!

## समीकरण जुळले तर जिल्ह्यात भाजपाच्या तुलनेत शिवसेनेला मिळणार बळ





बीड । किसान न्युज

**विधानपरिषदेसाठी सध्या जिल्ह्यात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे नाव चर्चेत असून, आधी भाजपाच्या कोट्यातून त्यांना संधी मिळणार असल्याचे बोलले जात होते. मात्र बीड जिल्ह्यात कोणाला संधी द्यायची किंवा नाही याचा सर्वस्वी अधिकार परळीला आहे. यामुळे जयदत्त क्षीरसागर यांना वैद्यनाथाचे आशीर्वाद मिळत नसल्याने त्यांनी भाजपाचा नाद सोडून दिला. पण तरीही त्यांना कल्याणच्या 'नाथा' च्या आशीर्वादाने विधानपरिषदेची संधी मिळणार असल्याचे खात्रीलायक माहिती आहे. यासाठी त्यांची चर्चा सुरू असून ९० टक्के चर्चा सकारात्मक असल्याचे सांगितले जात आहे. हे समीकरण जुळून आले तर जिल्ह्यात शिवसेनेला भाजपाच्या तुलनेत बळ मिळणार असल्याची चर्चा असल्याने ही संधी शिवसेना ही सोडणार नाही. यामुळे जयदत्त क्षीरसागर यांची विधानपरिषदवर वर्णी लागणार अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.**

विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक प्रोग्राम जाहीर झाला आहे. यामध्ये भाजपा ५, शिवसेना २, राष्ट्रवादी १ आणि महाविकास आघाडी १ अशा ९ जागा आहेत. या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात कोणाची विधानपरिषदवर वर्णी लागणार याकडे लक्ष लागले आहे. बीड जिल्ह्यातून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि माजी खा. प्रितम मुंडे यांची भाजपाच्या कोट्यातून वर्णी लागणार असल्याची चर्चा होती. पण आधीच पंकजा मुंडे या विधानपरिषदेवर असून मंत्री ही आहेत. यामुळे एका घरातून दोघांना संधी पक्ष देईल का? हा प्रश्न आहे. यामुळे जयदत्त क्षीरसागर यांची शक्यता होती. पण त्यांनी परळीला कट मारुन सरळ नागपूर गाठल्याने त्यांचे नाव मागे पडले आहे. कारण बीडमध्ये काय करायचे याचे सर्व अधिकार परळी कडे आहेत. या पार्श्वभूमीवर परळीच्या 'वैद्यनाथाचे' आशीर्वाद मिळत नसल्याने जयदत्त क्षीरसागर यांनी आता भाजपाचा नाद सोडला असल्याचे दिसून येत आहे. तरीही त्यांच्या गळ्यात विधानपरिषदेची माळ पडणार असल्याचे खात्रीलायक माहिती आहे. यासाठी त्यांना कल्याणच्या 'नाथा' चे आशीर्वाद मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. याबाबत त्यांच्या मुंबईत बैठका सुरू असून याबाबत ९० टक्के पर्यंत सकारात्मक चर्चा झाल्याची चर्चा आहे. जयदत्त क्षीरसागर हे बीड जिल्ह्यातील मोठं नाव असून, आजही जिल्हाभरातील प्रत्येक गावात त्यांचे समर्थक असून, यात प्रत्येक जाती धर्माच्या कार्यकर्त्यांचा जाळं आहे. यामुळे एक मोठा चेहरा शिवसेनेला मिळत असून, खरंच हे समीकरण जुळून आले तर जिल्ह्यात भाजपाच्या तुलनेत शिवसेनेला बळ मिळणार असल्याची चर्चा आहे. यामुळे ही चालून आलेली संधी शिवसेना सोडणार नाही यामुळे कल्याणच्या 'नाथा' च्या आशीर्वादाने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची विधानपरिषदेवर वर्णी लागणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे.

### देवेंद्र फडणवीसांचे आश्वासन हवेतच

मागील काही वर्षांपासून जयदत्त क्षीरसागर हे कोणत्याही पक्षात नसून त्यांनी बीड विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र पुतणे डॉ. योगेश क्षीरसागर हे भाजपाचे उमेदवार असल्याने देवेंद्र फडणवीस यांनी जयदत्त क्षीरसागर यांना माघार घेण्यास सांगितले होते. त्यावेळी भविष्यात विचार करण्याचे आश्वासन दिले होते अशी चर्चा होती. त्यामुळेच जयदत्त क्षीरसागर यांची भाजपाच्या कोट्यातून वर्णी लागणार अशी चर्चा होती. पण आता फडणवीसांचे आश्वासन हवेतच विरले असल्याची जिल्ह्यात चर्चा सुरू आहे.

## राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यावर प्राणघातक हल्ला
### परळी तालुक्यातील घटना

परळी । किसान न्युज

परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती संजय जाधव यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला आहे. विशेष म्हणजे, संजय जाधव जाधव अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहेत. या घटनेनं परळी अन् बीडमधील गुन्हेगारी पुन्हा चर्चेत आली आहे. ही घटना जाधव हे रात्री उशिरा शेतातून परत येत असताना दबा धरुन बसलेल्या टोळक्याने धारदार शस्त्राने हल्ला केला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास संजय जाधव हे गोवर्धन हिवरा ते सिरसाळा रोडवर असलेल्या आपल्या शेताकडून घराकडे जात होते. ते गोवर्धन शिवारात आले असता, दबा धरून बसलेल्या सहा जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने जाधव यांच्यावर वार केले. हा हल्ला नेमका कोणत्या कारणातून झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. बाजार समितीच्या माजी पदाधिकाऱ्यावर, असा हल्ला झाल्याने भीतीचे वातावरण आहे. दरम्यान, या हल्ल्यामागे नेमके कारण काय असावे याबाबत परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. काही दिवसांपूर्वीच संजय जाधव यांनी गावातील एका युवकाला मारहाण केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. यामुळे हा हल्ला त्याच वादातून झाला असावा का? असा संशय व्यक्त केला जात आहे. या हल्ल्यात जाधव गंभीर जखमी असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

### साष्ट पिंपळगाव वाळू घाटावर महसूलची धडक कारवाई
## बीडच्या वाळू माफियांनी जालना जिल्ह्याची वाळू चोरल्याचे उघड; प्रशासन करणार कारवाई

अंबड । किसान न्युज

तालुक्यातील साष्ट पिंपळगाव वाळू घाटावर जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरुन तहसीलदार यांनी धडक कारवाई केली. येथे अनेक अनियमितता दिसून आल्याने पूर्ण चौकशी होईपर्यंत वाळू घाट बंद केला तसेच एक हायवा जप्त केला. जालना जिल्ह्यातील वाळू बीडच्या वाळू माफियांनी चोरल्याचे उघड झाले आहे. यामुळे वाळू या बीडच्या वाळू चोरांवरही कारवाई होणार असल्याचे सांगितले जात आहे. साष्ट पिंपळगाव (ता. अंबड) येथील वाळू घाट क्रमांक १ बाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली, तहसीलदार विजय चव्हाण यांनी पथकासह वाळू घाटावर प्रत्यक्ष भेट देऊन कारवाई केली. या तपासणीत जालना » पान २ वर



### जिल्हा हद्दीचे उल्लंघन करुन वाळू चोरी

बीड जिल्ह्यातील वाळू घाटधारकांनी जालना जिल्ह्याच्या हद्दीतील साष्ट पिंपळगाव शिवारातून चक्क केनीच्या सहाय्याने अवैध आणि विनापरवाना वाळू उपसा करून ती बीड जिल्ह्यामध्ये ओढून नेल्याचे निदर्शनास आले आहे. जालना जिल्ह्याची वाळू अशा प्रकारे नियमबाह्य पद्धतीने पळवल्याबद्दल संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यामुळे जालना जिल्हा प्रशासनाच्या रडावर बीड जिल्ह्यातील वाळू टेंडर धारक दिसत आहेत.

## माने कॉम्प्लेक्स भागात गॅस सिलिंडर बदलत असताना भडका एक जन गंभीर जखमी

बीड । किसान न्युज

बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात आज दुपारी एक धक्कादायक अपघात घडला. एका घरात गॅस सिलिंडर बदलत असताना गॅस लिक



होऊन अचानक भडका उडाला. घरातील देवघरात दिवा सुरू असल्याने लिक झालेल्या गॅसने पेट घेतल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. या घटनेत भारत माने हे जखमी झाले असून त्यांच्या चेहऱ्यावर व हातावर गंभीर भाजल्या गेल्या आहेत. घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमींना बाहेर काढले. माहिती मिळताच अग्निशामक दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आग आटोक्यात आणली. सुदैवाने मोठा अनर्थ टळला असून घरातील इतर सदस्य सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे. जखमी भारत माने यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, गॅस सिलिंडर बदलताना योग्य खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे



बीड पोलीस शांतीलाल गर्जे यांचे पुतण्या महेश विष्णू गर्जे यांची बँक ऑफ बडोदा मध्ये एल बी ओ या पदावर निवड झाली असून या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या निवडीबद्दल त्यांचे गर्जे परिवारातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.



## आ.संदीपभैय्या आयोजित भीम गीताचा कार्यक्रम ठरला समाजप्रबोधनाचा प्रभावी मंच

### आनंद शिंदेंच्या भीम गीतांत न्हाऊन निघाले बीडकर





बीड । किसान न्युज

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त रविवारी झालेल्या आनंद शिंदे यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमास भीमसागर उसळला. यावेळी आनंद शिंदेंनी सादर केलेल्या भीम गीतांत बीडकर न्हाऊन निघाले.

बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रविवारी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. दरम्यान सायंकाळी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे ख्यातनाम लोकगायक आनंद शिंदे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास बीड शहर व परिसरातील भीम सैनिकांनी अलोट गर्दी केली. यावेळी भगवान गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला अभिवादन करून भीम गीतांच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. गायक आनंद शिंदे यांनी एकाहून एक भीम गीतं सादर करत उपस्थित भीमसैनिकांच्या भावनांना हात घातला.

### आ. संदीप क्षीरसागर यांचे चोख नियोजन आणि भीमकन्यांचा सन्मान!

महापुरुषांच्या जयंतीत जीव ओतून काम करण्यासाठी सर्वदूर परिचित असलेले आ. संदीप क्षीरसागर यांनी भीम गीतांच्या कार्यक्रमाचे चोख नियोजन केले होते. विशेष म्हणजे आ. क्षीरसागर यांच्या नियोजनातून या कार्यक्रमास उपस्थित सर्व भीम कन्यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

## नुकत्याच झालेल्या केज-धारुर राष्ट्रीय महामार्गावरील पूल खचला

केज । किसान न्युज

खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील केज शहरापासून जवळच पूल धारुर रस्त्यावरील पूल खचला असून, येथे मोठा खड्डा पडला असल्याने हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला आहे. नुकताच या राष्ट्रीय महामार्गाचे काम झालेले असून लगेच पूल खचल्याने कंत्राटदाराची पोलखोल झाली आहे. या पुलाच्या दुरुस्तीसाठी केज विकास संघर्ष समितीने आंदोलनाचा इशारा दिला आहे. कोट्यावधी रुपये खर्च करुन शासनाने खामगाव-पंढरपूर हा राष्ट्रीय महामार्ग केला

### रस्ता बनला मृत्यूचा सापळा; केज संघर्ष समिती करणार आंदोलन

आहे. हा महामार्ग धारुर-केज शहरातून जातो मात्र कंत्राटदाराने केलेल्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला असून, नुकताच काम झालेलं असताना चक्क केज शहरापासून धारुर रस्त्यावरील » पान २ वर



स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट
153,000
२२ कॅरेट
146,000
चांदी प्रतिकिलो
250,000

### सीईओच्या आदेशाला केराची टोपली!
## अतिरिक्त शिक्षकांची बंडखोरी: समायोन नंतर नवीन शाळेत रुजू होण्यास नकार



बीड । किसान न्युज

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संचमान्यता नंतर अतिरिक्त झालेल्या मुख्याध्यापक व शिक्षकांचे समायोजन केले मात्र समायोजन होऊन नवीन शाळेस रुजू होण्यास सीईओच्या आदेशाला काही शिक्षकांनी सरळ कराची टोपली दाखवली आहे. समायोजन प्रक्रियेनंतरही अनेक अतिरिक्त उर्दू माध्यमाच्या शिक्षक आपल्या मूळ शाळेतून कार्यमुक्त होण्यास तयार नाहीत आणि नवीन शाळेत रुजू होण्यास स्पष्ट नकार देत आहेत. ही बाब अतिशय गंभीर असल्याचे असून प्रशासनाचे धाक राहिला नाही असे दिसून येत आहे. समायोजनानंतरही काही शिक्षक दिलेल्या नवीन शाळेत रुजू न झाल्यामुळे शाळांमध्ये शिक्षक तुटवडा निर्माण झाला आहे आणि याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. सदरील बाब शिस्तभंगाची असून अशा शिक्षकांवर तात्काळ शिस्त » पान २ वर